# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.03.2025** **वारःशनिवार**

1. भारत आणि युरोपिअन आयोगादरम्यान विविध क्षेत्रातील भागीदारीबाबत चर्चा
2. अमेरिका- यूक्रेन दरम्यानची दुर्मिळ खनिजांवरील कराराची चर्चा निष्फळ
3. उत्तराखंडमध्ये हिमस्खलनात अडकलेल्या 32 कामगारांना वाचवण्यात यश 22 जणांचा शोध सुरु
4. हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत आणि
5. आयसीसी करंडक स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, भारत आणि न्यूझीलंड संघ उपांत्य फेरीत

**पंतप्रधान**

भारत आणि युरोपिअन आयोगादरम्यान व्यापार, हरित ऊर्जा आणि दळणवळण क्षेत्रातील भागीदारी संदर्भात काल नवी दिल्लीत चर्चा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा केली. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, नवोन्मेष, स्वच्छ आणि हरित ऊर्जा, दळणवळण, नागरिकांमधील परस्पर संबंधातील भागीदारी वाढवण्यासाठी वचनबद्धता सुनिश्चित करण्यासाठी चर्चा झाली.

भारत आणि युरोपियन आयोगामधील धोरणात्मक भागीदारी गेली दोन दशकं जुनी असून त्याच्या मुळाशी विश्वास, लोकशाही मूल्यांवर आधारित प्रगती आणि समृद्धीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याबाबत वचनबद्धता आहे. असं दोनही नेत्यांच्या चर्चेनंतर, जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. या चर्चेदरम्यान पंतप्रधानांनी सायबर सुरक्षा, सागरी सुरक्षा आणि दहशतवादविरोधी सहकार्य वाढविण्यावर भर दिला. यावेळी हिंद प्रशांत महासागर प्रदेशात शांतता, सुरक्षा, स्थिरता आणि समृद्धीबाबत एकमत झाल्याचं नमूद केलं.

भारतात सूफी परंपरेनं स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीतील आयोजित जहां-ए-खुसरो सूफी संगीत महोत्सवाला संबोधित करताना काढले. पंतप्रधानांनी देशवासियांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सूफी संगीत महोत्सवाचं रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. रुमी फाउंडेशननं आयोजित केलेला हा महोत्सव उद्यापर्यंत चालेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत कृषी आणि ग्रामीण समृद्धी या विषयावर अर्थसंकल्पोत्तर चर्चासत्राला दुरस्थ माध्यमातून संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमात सर्व केंद्रीय मंत्री सहभागी होतील. पुढील आर्थिक वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात ज्या घोषणा करण्यात आल्या आहेत त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसंच धोरणात्मक स्तरावर काय अपेक्षित आहे याबाबतच्या चर्चेत भागधारकांना सहभागी करून घेणं हा या वेबिनारचा उद्देश आहे. तसंच आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं होणाऱ्या NXT परिषदेला पंतप्रधान उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमादरम्यान, न्यूजएक्स वर्ल्ड या वाहिनीची सुरुवात त्यांच्या हस्ते होणार आहे.

**शहा-बैठक**

गृहमंत्री अमित शहा यांनी काल एका उच्चस्तरीय बैठकीत राष्ट्रीय राजधानीतील कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेतला. बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना देशात प्रवेश करण्यास आणि त्यांच्या वास्तव्यास मदत करणाऱ्या संपूर्ण नेटवर्कवर कडक कारवाई करण्याचे निर्देश शहा यांनी दिले आहेत. बेकायदेशीर घुसखोरांचा मुद्दा राष्ट्रीय सुरक्षिततेशी जोडलेला असल्याने तो कठोरपणे हाताळला पाहिजे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, दिल्लीचे गृहमंत्री आशिष सूद, पोलिस आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. शहा यांनी दिल्लीतील आंतरराज्य टोळ्यांचा नायनाट करणं आणि अंमली पदार्थांचं जाळं उद्ध्वस्त करण्यावर भर दिला. दिल्लीतील बांधकामांशी संबंधित बाबींमध्ये दिल्ली पोलिसांची परवानगी आवश्यक राहणार नाही असं शाह यांनी सांगितलं. दिल्ली पोलिसांना अतिरिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

**दिल्ली-अहवाल**

दिल्लीतील आम आदमी पक्षाच्या सरकारच्या काळात सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवा व्यवस्थापनावरील भारतीय नियंत्रक आणि महालेखा परीक्षक यांच्या अहवालात ताशेरे ओढण्यात आले आहेत. कोविड काळात निधीचा कमी वापर, प्रकल्प अंमलबजावणीतील विलंब आणि शहरातील रुग्णालयांमध्ये औषधे आणि कर्मचाऱ्यांची कमतरता हे मुद्दे अधोरेखित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिल्ली विधानसभेत सादर केलेल्या अहवालात मागील सरकारनं कोविड काळात केंद्राकडून मिळालेल्या सुमारे 788 कोटींपैकी सुमारे 543 कोटी रुपये वापरल्याचं म्हटलं आहे. 2016-17 ते 2021-22 या कालावधीत दिल्लीच्या सरकारी रुग्णालयांमध्ये हिमोफिलिया आणि रेबीजसारख्या दुर्मिळ आणि घातक आजारांसाठी इंजेक्शनची कमतरता होती असं उघडकीस आलं आहे.

**अमेरिका-युक्रेन**

अमरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रंप आणि यूक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेंस्की यांच्या दरम्यान दुर्मिळ खनिजांवरील कराराची चर्चा निष्फळ ठरली. चर्चेनंतर ट्रंप यांनी बातमीदारांना सांगितलं की झेलेंस्की हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचा द्वेष करतात त्यामुळं झेलेंस्की यांच्यासोबत सहमती होणं कठीण आहे. तर झेलेंस्की यांनी रशियासोबत युद्धावर कोणतीही तडजोड करणं शक्य नाही असं ट्रंप यांना ठणकावून सांगितलं आणि करारावर स्वाक्षरी न करताच ते व्हाईट हाऊसमधून बाहेर पडले. नंतरची संयुक्त वार्ताहर परिषदही रद्द करण्यात आली. झेलेंस्की हे शांततेसाठी तयार असतील तेव्हा ते परत अमेरिकेत येऊ शकतात असं ट्रंप यांनी एका संदेशात सांगितलं. युक्रेनला रशियाविरुद्धच्या युद्धात अमेरिकेची मदत करण्याच्या मोबदल्यात युक्रेनमधील दुर्मिळ खनिजं आणि अन्य नैसर्गिक साधनस्रोतांवर अमेरिकेला हक्क देण्याचा करार या दोन्ही देशांदरम्यान होणं अपेक्षित होतं परंतु ती चर्चा आता फिसकटली आहे.

**जीडीपी**

वर्तमान आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत भारताचा सकल देशांतर्गत उत्पन्न अर्थात जीडीपी दर 6 पुर्णांक 2 टक्क्यांनी वाढला आहे. यामुळे भारत सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात आहे, मागील तिमाहीत हा दर 5 पुर्णांक 6 टक्के होता. गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीत भारतानं 8 पुर्णांक 6 टक्के जीडीपी वाढ नोंदवली होती. गेल्या हंगामात झालेल्या चांगल्या पावसाळ्यानंतर ग्रामीण भागातील उत्पन्नाचा वापर आणि सरकारी खर्चात वाढ झाल्यानं तिसऱ्या तिमाहीतील जीडीपीच्या दरामध्ये वाढ झाली.

**कुटिन्हो-अंगणवाडी**

अनुभवी समग्र आरोग्य प्रशिक्षक आणि ल्यूक कुटिन्हो होलिस्टिक हीलिंग सिस्टीम्सचे सह-संस्थापक, ल्यूक कुटिन्हो यांनी पोषण अभियानाची पाहणी करण्यासाठी नवी दिल्लीतील अंगणवाडी केंद्राला भेट दिली. द्वितीय सक्षम अंगणवाडी आणि पोषण कार्यक्रमाद्वारे कुपोषणाचा सामना करण्याच्या केंद्र सरकारच्या वचनबद्धतेनुसार या भेटीचं आयोजन करण्यात आलं. आपल्या भेटीदरम्यान, कुटिन्हो यांनी अंगणवाडी कर्मचारी आणि केंद्रातील मुलांशीही संवाद साधला आणि सर्वांना चांगलं पोषण आणि निरोगी जीवनशैली पद्धतींबद्दल प्रेरणा दिली. नंतर बातमीदारांशी बोलताना कुटिन्हो यांनी निरोगी भारत निर्माण करण्यासाठी लठ्ठपणाच्या समस्येचा सामना करण्याच्या महत्त्वावर भर दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लठ्ठपणाच्या समस्येशी लढण्याबाबत मांडलेला दृष्टिकोन योग्यच आहे. लठ्ठपणा आणि जीवनशैलीचे आजार रोखण्यासाठी संतुलित आहार, सक्रिय जीवनशैली आणि जागरूकता निर्माण करण्याच्या गरजेवर कुटिन्हो यांनी भर दिला.

**उत्तराखंड**

उत्तराखंडमध्ये, चमोली जिल्ह्यातील माना गावाजवळ काल सकाळी झालेल्या मोठ्या हिमस्खलनात अडकलेल्या 32 कामगारांना वाचवण्यात यश आलं आहे. सीमा रस्ते संघटनेचे कमांडर अंकुर महाजन यांनी आकाशवाणीला सांगितलं की, उर्वरित 22 कामगारांना वाचवण्यासाठी आयटीबीपी, लष्कर, बीआरओ, राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती दलाची पथकं शोध मोहिमेत गुंतली आहेत. तथापि, वाईट हवामानामुळं या प्रयत्नांमध्ये अडथळा येत आहे. गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्याशी बोलून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिलं. मुख्यमंत्र्यांनी डेहराडून इथल्या राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षात बचाव कार्याचा आढावा घेतला.

**हिमाचल-हवामान**

हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टीमुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. भूस्खलन आणि बर्फ साचल्यामुळे राज्यातील 200 हून अधिक रस्ते बंद आहेत, तर 250 हून अधिक वीज ट्रान्सफॉर्मर निकामी झाले आहेत. कमाल तापमान 4 ते 5 अंश सेल्सिअसनं कमी झालं आहे. राज्यात भूस्खलनाच्या अनेक घटना घडल्या आहेत तसंच आदिवासी भागात हिमनदी घसरल्याचीही नोंद झाली आहे. पांगी खोऱ्यात साडेतीन फुटांपेक्षा जास्त नवीन बर्फवृष्टी झाली आहे, तर मनालीमध्ये सुमारे एक फूट बर्फवृष्टी झाली आहे. कुल्लू जिल्ह्यात, पेहानाला इथं ढगफुटीमुळं अनेक वाहनं ढिगाऱ्याखाली गाडली गेली आहेत. लाहौल-स्पिती, किन्नौर, पांगी, भरमौर आणि दोदरा क्वार या आदिवासी भागांचा जगाच्या इतर भागांशी पूर्णपणे संपर्क तुटला आहे. अधिकाऱ्यांनी नागरीकांना खबरदारी घेण्याचं आणि नदीकाठच्या ठिकाणांपासून दूर राहण्याचं आवाहन केलं आहे.

**आयसीसी करंडक**

आयसीसी करंडक अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धेत काल लाहोर इथं झालेल्या ब गटाच्या सामन्यात ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान काल सामना झाला.  पावसाच्या व्यत्ययामुळं दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला. अफगाणिस्तान संघानं दिलेलं 274 धावांचं आव्हान दिलं होतं परंतु पावसाच्या व्यत्ययामुळं ऑस्ट्रेलिया संघानं 12 षटकं आणि 5 चेंडूत 109 धावा केल्या. ऑस्ट्रेलिया, भारत आणि न्यूझीलंड संघ गट अ विजय मिळवत उपांत्य फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार